म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५६८
REFBK-0025148
REFBK-0025148

२५४९
२५७४८
९२।१०।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 NOV 1986
16 NOV 1986
19 NOV 1986
3 DEC 1986
10 DEC 1986
20 AUG 1989
DEC 1986
30 JUN 1990

( क्र. मा. पहा )
५०००-३-८४

# सफेत टोपी लाल बत्ती

रामदास फुटाणे

REFBK-0025148
REFBK-0025148

ऋतुराज प्रकाशन, मुंबई–२०

० प्रकाशक :
प्रकाश नेवासकर
ऋतुराज प्रकाशन
६१ डी रोड, मुंबई-२०

० मुद्रक :
चंद्रकांत फडके
किर्लोस्कर प्रेस
वीर सावरकर नगर,
पुणे-३७

० प्रकाशनकाल :
जुलै १९८६

सर्वाधिकार
रामदास फुटाणे

० मुखपृष्ठ :
'ऋतुराज'

मूल्य : २५ रुपये

# आभार

पु. वि. बेहेरे, श्री. द. सरदेशमुख, इसाक मुजावर, पु. रा. बेहेरे, ज्ञानेश सोनार, दया पवार, फ. मुं. शिंदे, चंद्रकांत फडके, पी. डी. कुलकर्णी, किर्लोस्कर प्रेस, अशोक कोठावळे, मॅजेस्टीक बुक स्टॉल, प्रभाकर सिद्ध.
या पुस्तकातील बहुतेक कविता सा. जत्रामध्ये व काही कविता सा. चित्रानंद, सा. मनोहर, दै. नवशक्तिमध्ये प्रकाशित झाल्या आहेत.

## ० कै. दत्तू बांदेकर ०

" अश्रूतून हास्य आणि हास्यातून अश्रू निर्माण करणारा अद्‌भूत जादूगार " अशा शब्दांत साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांनी ज्यांचा गौरव केला त्या कै. दत्तू बांदेकरांचा मराठी साहित्याच्या प्रांगणात विनोदी लेखक म्हणून केवळ योगायोगानेच प्रवेश झाला.

व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत कानडी भाषेतून शिक्षण घेतलेल्या बांदेकरांना सुरुवातीस मराठी भाषेचा फारसा गंध नव्हता. परंतु मुंबईला आल्यानंतर त्यांच्या वडील बहिणीने सातत्याने दत्तू बांदेकरांकडून मराठीचा पाठ करवून घेतला आणि अल्पावधीतच मराठी भाषेवर बांदेकरांनी प्रभुत्व गाजविले.

शिक्षणाच्या अभावामुळे नोकरी मिळेना म्हणून " रेडिओ स्टार्स " मध्ये द्वाररक्षकापासून पडदे ओढण्यापर्यंतचे पडेल ते काम त्यांनी सुरुवातीस केले व पुढे आर्थिक ओढाताणीस कंटाळून मुंबई सोडून पुण्यास गेले.

तेथेच नाट्यमन्वंतरचे प्रा. अनंत काणेकर यांची बेकारीमुळे कृष झालेल्या बांदेकरांवर नजर पडली व त्यांनी बांदेकरांना आपल्या कंपनीत नोकरीस ठेवले. योगायोगाने ' चित्रा ' साप्ताहिकाचे मो. ग. रांगणेकर यांच्याशी कै. बांदेकरांचा परिचय झाला व १९३५ च्या सुमारास ' सख्याहरी ' च्या रूपाने साहित्यिक दत्तू बांदेकरांचा जन्म झाला.

समाजातील दांभिकपणा, भंपकपणा यांवर आपल्या विनोदी शैलीने ताशेरे ओढून महाराष्ट्राच्या तमाम वाचकांना बांदेकरांनी अक्षरशः वेड लावले. त्यांच्या या अद्‌भुत प्रतिभेवर मोहित होऊन साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांनी १९३९ च्या सुमारास आपल्या ' नवयुग ' साप्ताहिकाची जबाबदारी कै. बांदेकरांवर टाकली व तेव्हापासून अखेरपर्यंत सतत वीस वर्षे कै. दत्तू बांदेकर यांनी ' नवयुग ' आणि इतर वृत्तपत्रांतून निव्वळ विनोदी लिखाणाशिवाय दुसरे काहीच लिहिले नाही.

सारा जन्म वृत्तपत्रसृष्टीत गेल्यामुळे त्यांचा पिंड राजकारणावरच पोसला होता. त्यामुळे त्यांच्या विनोदाला ताजेपणा व खमंगपणा येई. आजही काळ बदललेला असला तरी ' राजकारण ' जेथल्या तेथेच आहे, म्हणूनच कै. दत्तू बांदेकरांच्या विनोदी साहित्याची लज्जत आणि बहार अजूनही कायम आहे; आणि दीर्घकाळपर्यंत महाराष्ट्राला मनसोक्त आनंद देण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाङ्मयात आहे.

| | |
|---|---|
| जन्म | मृत्यु |
| ९-९-१९११ | ४-१०-१९५९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

महाराष्ट्राचे थोर व्यंगकार
कै. दत्तू बांदेकर
यांच्या स्मृतीस—

रामदास फुटाणे यांचा 'सफेत टोपी लाल बत्ती' हा व्यंग कवितांचा संग्रह ८२ सालापासून तो आजतागायत प्रसिद्ध झालेल्या ह्या कविता. 'सामना', 'सर्वसाक्षी' ह्या चित्रपटांद्वारे त्यांचे नाव मराठी रसिकांपर्यंत पोहचलेले. हिंदी भाषिकांना कवि म्हणून आधीच ज्ञात असलेले श्री. फुटाणे मराठी कवितेच्या क्षेत्रात उशीराच धुमकेतूसारखे उगवत आहेत.

त्यांची व्यंग कविता ही बंदुकीच्या गोळीसारखी सणाणत येते आणि भोवतालच्या राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात जी बजबजपुरी माजली आहे त्याचा दंभस्फोट करते. आपले लक्ष्य शोधताना त्यांना केवळ व्यक्ती ही अभिप्रेत नसते तर प्रवृत्ती त्यांना उघडी नागडी करावीशी वाटते. अशावेळी वाचक हसता हसता अंतर्मुख होतो आणि स्वातंत्र्यानंतरही आपण नेमके कोणत्या ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहोत याचे त्याला आत्मभान येते. पेशव्यांच्या दरबारात जाऊन सत्ताधिशांच्या तोंडावर त्यांचे वाभाडे काढणाऱ्या होनाजीच्या परंपरेतील फुटाणे ह्यांची ही व्यंग कविता. सत्तेच्या बेगडी जगात त्यांची लाल बत्ती धोक्याचा संदेश ठरणार आहे.

—दया पवार

'सफेत टोपी लाल बत्ती' वर्तमान आणि वर्धमान राजकारणाचा व्यंगशैलीनं नटलेला आलेख आहे. व्यक्ती, राजकारण आणि स्वभाव यांतून चित्रविचित्र राजकारण पुढं येतं. पुढं येण्यात ज्यांचा हातभार असतो ते पुढारी. पुढाऱ्यांच्या पोटात शिरून आपले कविताविषय बाहेर काढण्यात कवी रामदास फुटाणे वाकबगार आहेत.

सामान्यांना सहभागी करून घेणारी ही कविता आहे. अनुरूप भाषा ही त्या त्या प्रसंगाची गरज असते. प्रसंग अचूक 'टिपण्यात' फुटाण्यांची भाषा उदंड लोकप्रियतेची मानकरी ठरते. लोकभावनेला हात घातल्याशिवाय लोकप्रियता मिळत नाही. लोकमानसाची आणि राजकारणाची नस सापडल्यामुळं शब्द जिभेवर, कानात आणि डोक्यात कसे पिंगा घालतात ते फुटाण्यांच्या काव्यशैलीनं दाखवून दिलं आहे.

भल्याभल्यांना टोपी घालणारी, लाल बत्तीचं वास्तव उघडंनागडं करणारी अशी ही मुळातच प्रवृत्तिवेधाची कविता आहे. टीका हा तिचा गुणधर्म आहे. ही कविता स्वभावानं म्हणूनच खटबाळ आहे. त्याला इलाज नाही. राजकारण आहे तोवर हे घडणारच !

—फ. मुं. शिंदे

ग्रंथ संग्रहालय ठाणे

## दोन शब्द

डोळ्यांत मार्क्सचा लाल रंग उतरत असतानाच
हृदयात शिवबाचा भगवा फडकत असतो.
पश्चिमेचं मुक्त निळं आकाश खुणावत असतं.
लाल, पांढऱ्या, निळ्या, केसरी, हिरव्या टोप्या
घोंगावत असतात.
पंजाबात व श्रीलंकेत वाहणारे रक्ताचे पाट
डोकं बधीर करीत असतात.
शिवजयंतीच्या मिरवणुकीलासुद्धा आजकाल
रक्ताचाच नैवेद्य लागतो.
दोन कानामधील प्रदेश अस्वस्थ होतो.
खरं तर गंभीर जळजळीत लिखाण लेखणीतून
पाझरणं आवश्यक असताना धुळवडीतील खट्याळपणाचे
रंग फेकण्याचा मोह टाळणे आवश्यक होते.
परंतु मित्रांच्या आग्रहाखातर माझे पहिलेच मराठी
पुस्तक वाचकांच्या हाती देत आहे, वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी.
ज्या वयात बंगला बांधावा त्या वयात
आकाशकंदील चिकटवत बसलोय
इतरांच्या दिवाळीसाठी.

रामदास फुटाणे

## कुंपणावरचा

यशापयशाच्या चढउतारानंतर
तो थांबला दरीच्या टोकावर
पुढे जाणे शक्य नव्हते
थांबण्याचे सामर्थ्य नव्हते
त्याने स्वगृही परत जायचे ठरविले
तो परत जाणार तोच
गृहाचा ताबा घेतलेल्या
उपऱ्यांनी त्याला थांबविले
त्याचे आगमन लांबविले.
आज तो उपरा
उपरे वतनदार झाले होते.
तो पुन्हा आपल्या
आवडत्या कुंपणाकडे निघाला.
हळू हळू डोळ्यांच्या पापण्या उचलत
त्याने सह्याद्रिच्या रांगा पाहिल्या

## बाबा ' साहेब '

एका ' बाई 'ने एका ' बाबा 'चा
बाबा ' साहेब ' केला
तेव्हा एक कावळा गडावरील
पुतळ्यावर शीटून गेला
पुतळा चिडला, घोडा चिडला
घोड्याचा नाल चिडला
तेव्हा जखमी सह्याद्रि यमुनातटी
मुसमुसत रडला !

३ ऑक्टोबर १९८२

## ठोकळा

' निर्मळ ' मनाचा मेहुणा
बोलायला मोकळा
पण सोलापूरचा जावई
डोक्याने ' ठोकळा '

१२ डिसेंबर १९८२

# बीसवी सदी की
# ' जिजामाता ! '

ओंठोपे लिपस्टीक लाल था
मेकप से थपथपा गाल था
माथे पे बिंदिया थी विशाल
वह अखंड ' सौभाग्य ' का निशाण थी
बीसवी सदी की जिजामाता
उच्च जाति का अभिमान थी
वह शुगर की मुस्कान थी

० ० ०

आखों मे शालीनता न थी
शालीनता ' आय ' में डूबी
' आय ' में डूबा था ' बसन्त '
वह ग्रीष्म की पहचान थी
वह शुगर की मुस्कान थी

० ० ०

न पैदा हुआ कोई शिवाज़ी
फिर भी संभाजी की वह दादी थी
औरों के लिये वह दादा थी
' दादा ' के लिये बरबादी थी
बीसवी सदी की जिजामाता
उच्च जातिका अभिमान थी
वह शुगर की मुस्कान थी

१० ऑक्टोबर १९८२

## तत्त्व

बाईचा काढुनि मोठा फोटो
सुंदर त्याला फ्रेम करा
जोवरि सत्ता तोवरी भत्ता
खुर्चीवरती प्रेम करा.

३ ऑक्टोबर १९८२

## डी. डी. पालापाचोळा

लाल बत्ती ' चं–वहान ' घेऊन
' पाचोळ्या 'ने कित्ता गिरविला
' रेड लाईट ' एरियात
' ए–रंडी ' वरून हात फिरविला

३ ऑक्टोबर १९८२

## उद्‌घाटन

मंत्रीपदावरून दूर होताच
तो मंत्रालयाऐवजी दिवसा
घरीच झोपायचा.
बायकोने जरा हलविताच
तिचीच रिबीन कापायचा !

३ ऑक्टोबर १९८२

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य

त्याला आंबेत कराडसारखे
कराड बारामती सारखे
बारामती सांगली सारखे
सांगली पुसद सारखी
पुसद नांदेड सारखे
अन् नांदेड कराड सारखे दिसू लागले
तो गालात हसला
कुंपणाच्या जरा अलीकडे बसला.
तोच त्याच्या डोळ्यांनी
त्याच्या गालावर लघवी केली
अश्रू स्वतःचे व इतरांचेही
त्याने पुसले होते
परंतु नेत्र मूत्र प्रथमच अनुभवत होता.
धोतराच्या सोग्याने
त्याने डोळे व गाल पुसले
मनात उभा केलेला
विशाल सह्याद्रि पुसला
व मालकिणीच्या
इशाऱ्याची वाट पाहात पाहात
तो कुंपणावरच बसला.

## उद्याचा राज्यपाल

तो वदला--" राजीव माते !
मज छळती ' शुगर ' नेते
' फंडोबा ' आंबेतवाला,
अन् ' वाय. बी. ' कराडवाला,
तो ' दादा ' सांगलीवाला,
मजवरती करिती घाला "
ढसढसा तिजपाशी रडला !
भोसला आडवा पडला

हलकेच त्यास उठवूनि
कर त्याच्या माथा ठेवुनि
वदली ती त्याची माता
कर्नाटकी जाता-जाता
" रडू नको असा तू बाळ
करीन मी तुज राज्यपाल ! "

२ जानेवारी १९८३

# आज ना उद्या

लाखो बांगला निर्वासितांनी
संपूर्ण आसाम व्यापला आहे
निधर्मी सत्ताधीश दिल्लीत
ऐषारामात झोपला आहे

सत्तेसाठी बळी घेणे
हे कुकर्म अघोरी आहे
भूपुत्रांना जगण्याची
या देशात चोरी आहे

आसाम येथे जळताना
संपूर्ण देश थंड आहे
टोपी कोणत्याही रंगाची असो
प्रत्येक नेता षंढ आहे

आज ना उद्या कधी तरी—
पंजाब, काश्मीर, आसाम जाईल
भारतीय परकीय होऊन
गुलामीची रोटी खाईल

उद्या या देशाचे नाव
भारत नसेल
अरबांच्या मनात आज
खरंच काय हो असेल ?

६ मार्च १९८३

## ॲलर्जी

मतांसाठी राखतात
'त्यांची' ते मर्जी
निधर्मी राज्याला
हिंदूंची ॲलर्जी !

२३ जानेवारी १९८३

## 'लोक' संख्या

हिंदू, शीख, ख्रिश्चन
वा असो लोक मुसलमान,
कायदा असावा
सर्व धर्मांना समान,
ही साधी बाब, बाई
तुला का ग पटत नाही ?
'लोक' संख्या वाढताना
तुला काहीच वाटत नाही ?

२३ जानेवारी १९८३

## काळे विधेयक

मूठभर मतांसाठी
विधेयक आले
ही देशद्रोह्यांची खाज वाटते

तीनशे बहात्तर टोणगे
नपुंसक निघाले
याची आम्हाला लाज वाटते

हा सारा प्रकार आम्हाला
जीव घेणारा 'गर्द' वाटतो
लाल बत्ती ठोकरणारा
आरिफ फक्त मर्द वाटतो !

२५ मे १९८६

## संशय

त्याच्या शर्टच्या बटनात
अडकलेला लांब केस पाहून
तिला त्याचा संशय आला
ती रात्रभर जागू लागली
त्याने शिखर परिषद
सुरू करताच
ती अलिप्तासारखं
वागू लागली.

१७ एप्रिल १९८३

(दिल्ली येथे अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद भरली होती त्याचे पडसाद)

## ऋतुचक्र

हासत–नाचत कुंकू लावीत
वदली ती ‘ शालीन ’ बाला
‘ वर्षा ’ जाऊनी रायगडावर
‘ वसंत ’ ऋतु हा आला !
तेव्हा–
तंबाखू चोळीत
भविष्यकाळ घोळीत
एक ‘ बारामतीवाला ’ म्हणाला
हे ‘ ऋतु ’चक्र महाराष्ट्राला
कोठे नेणार आहे ?
आज‘वसंत’तर उद्या
‘शरद’ऋतु येणार आहे !

१३ फेब्रुवारी १९८३

## प्रथा

‘ रायगडा ’वर मेघगर्जना झाली
एका दिवसात ‘ वर्षा ’ आली
तेव्हा फणी आरशाला म्हणाली–
‘ कुंकू ’ बदलण्याची प्रथा
फार जुनी झाली !

६ मार्च १९८३

## स्वप्नभंग

‘ अशीच आमुची एकी असती ’
वदले छत्रपती
‘ दिल्लीही वाकेल पाहुनि
कराड—बारामती ’
परी घोड्याने लीद टाकली
पुतळा डळमळला
स्वप्नभंग शिवबाचे पाहुनि
सह्याद्रि तळमळला

## पायजमा

एकमेकांच्या पायात पाय
कार्यकारिणीची गरजच काय ?
कांबळेभाऊ, कांबळेभाऊ
यादी घेऊन चालता कशाला ?
दिल्लीच्याच हातात ‘ नाडी ’
मग—
पायजमा घालता कशाला ?

## सवत

द्विभार्या प्रतिबंधक कायदा
असतानासुद्धा एका राज्याने
मुख्यमंत्र्याबरोबरच
उपमुख्यमंत्रीसुद्धा ठेवला
सचिवालयातील सचिव मात्र
दोन्ही सवतीच्या घरी
मिटक्या मारीत जेवला

१९ जून १९८३

## खा सदा र अ कर्ते

खासदार जे. सी. अकर्तेंना
सावरकरांची ॲलर्जी होती
त्यांच्या अनेक मित्रांची मात्र
हाजी मस्तानवर मर्जी होती !

अकर्तेंसारख्या लाचारांमुळे
देश पारतंत्र्यात बुडणार आहे
अकर्तेंचे विमान तेव्हा
गल्फकडे उडणार आहे !

७ ऑगस्ट १९८३

## पुरुषार्थ

देशाच्या रक्षणासाठी
बंदुकीची गोळी हवीय
म्हात्रेंचा बदला बदला घेणारी
परदेशात टोळी हवीय !

२६ फेब्रुवारी १९८४

## चाहूल

काल उत्तर जळत होता
आज दक्षिण फाटत आहे
शस्त्रासाठी अमेरिकेचे
सिलोन बूट चाटत आहे !

२२ एप्रिल १९८४

## शंकानिरसन

नकाशा पाहून सांगतो
मालेगाव महाराष्ट्रात आहे
महाराष्ट्र भारतात आहे
देवाशपथ खरं सांगतो
मालेगाव भारतातच आहे !

२४ जुलै १९८३

## लक्षण

सर्वधर्मसमभावना
हेच खरे शिक्षण आहे
तरीसुद्धा—
हिंदुत्वाची लाज वाटणे
नपुंसकतेचे लक्षण आहे !

## बलात्कार

आसाममध्ये—जाळपोळ
पंजाबमध्ये—अकाली घोळ
काश्मीरमध्ये—पाक टोळ
सर्वत्र टोळ भैरवांचा
सत्कार होत आहे
जनतेवर वैचारिक
बलात्कार होत आहे !

६ फेब्रुवारी १९८३

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५८६
२५५१२
काव्य ५५१०५
शाखा

## खंडोबा

एक एक आमदार
बंडोबा चोरत होता
बंडोबा थंडोबा समजून
'खंडोबा' घोरत होता.

## अप्पू

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री
डोळे भरून पाहिला
एशियाड संपले तरी
अप्पू शिल्लक राहिला

## शताब्दी

तीन तीन बॅरिस्टर
बॅऽऽ बॅऽऽ करू लागले
हळूहळू कॉंग्रेसची
'शंभरी' भरू लागले

## प्राध्यापक (?)

जरुरीपेक्षा जीभ लांब झाली
ही लाल दिव्याची मस्ती आहे
प्राध्यापक असून काय उपयोग
ही ' रेड लाईट ' वस्ती आहे

## अंकूर

तिरपुडेंच्या नथीतून
विभाजनाचा तीर सुटला
स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला
अदृश्य अंकुर फुटला

१० जुलै १९८३

## तक्रार

मंत्रीपद गेलेल्या मंत्र्यांची
बायको होती बडबडी,
मैत्रिणीला म्हणायची
' रातभर मुवा सोने न दे
कुर्सी समझे घडी घडी ! '

## धूर्त

कुंपणावरून ते म्हणाले—
' मी कसे ठरवू
कुणी जावे कुणी जाऊ नये ? '
' बाबा ' गेल्याचे दुःख नाही
परंतु अंतुले सोकावू नये !

३० जानेवारी १९८३

## जाता—जाता

माध्यमिक शिक्षणाची फी
माफ करण्यात आली
घटस्फोट घेण्यापूर्वी
वांझोटी गरोदर झाली !

६ फेब्रुवारी १९८३

## प्रजासत्ताक

टोप्या फिरल्या
घोषणा जिरल्या
झेंडा उभा राहिला
उपर चंगा
नीचे नंगा
प्रजासत्ताक पाहिला !

## घास

महाराष्ट्रात सर्वत्र
पाऊस पडला
तेव्हा एक पुढारी
सरकारी नोकराजवळ रडला—
“ दुष्काळाचा त्रास गेला
पण,
आपल्या तोंडचा ‘ घास ’ गेला. ”

१७ ऑक्टोबर १९८२

## वर्दी

दुष्काळाने ग्रासलेले
पावसाळी अधिवेशन
त्यांनी जिंकले
तरीसुद्धा काही आमदार
दिल्लीत जाऊन शिंकले—
“ महाराष्ट्रात सर्दी आहे
‘ सी–एम ’ हटावची गर्दी आहे
आता—
कोणत्या ‘ बाहुली ’ची वर्दी आहे ? ”

१७ ऑक्टोबर १९८२

## अक्षरे

नवी नवी अक्षरे
काँग्रेसने वाटली
एकाने कंसात ‘ एस. ’
तर दुसऱ्याने
‘ आय ’ घातली.

१७ ऑक्टोबर १९८२

## राज्यभारती

## ओळखा पाहू कोण ?

### एक

शपथविधीला सर्वात पुढे असते
' सी.एम. 'च्या शेजारी पटकन् बसते
मोठे कुंकू सांभाळीत कॅमेरा पाहून हसते
ती कोण ?

### दोन

' अम्मा 'च्या फोटोच्या रोजच
पाया पडतो
महाराजांचा पुतळा याला पाहून चिडतो
दिवसभर तो विमानतळावरच बसतो
मिळालाच थोडा वेळ तर
' रायगडा 'वरही असतो
तो कोण ?

### तीन

' स्टेट ' नको पण ' कॅबिनेट 'च व्हावे
वाटे
पण,
' गुलाबा 'च्या फुलाला ' सांगली 'चेच
काटे
तो कोण ?

### चार

' फाईल सांगा तरच शपथ घेतो
' छत्रपती 'चा अडलेला गाडा पुढे नेतो '
' अग अग म्हशी ' म्हणत कॅबिनेटमध्ये
घुसतो
तो कोण ?

२४ ऑक्टोबर १९८२

## अ–स्मिता

सोलापूरच्या सभेत
तिची अ–स्मिता बडबडली
हिंदी सिनेमाच्या पडद्यावर
तिने सगळी बटनें उघडली
संसारात रमतात
त्या असतात भुक्कड बाया
क्रांतीकारी तीच–
बहु बाहूत देते काया

१३ फेब्रुवारी १९८३

## कायदा

फुलंच उधळा अंगावरती
सुमनांची पडू द्या रास
फाशी त्यांना देऊ नका हो
मानेला होईल त्रास
प्रेमाने कुरवळा तयांना
नका हो मारू दांडू
धावूनी येते बुद्धि जेव्हा
कायदा होतसे 'पांडू!'

(जोशी-अभ्यंकर हत्याकांडातील गुन्हेगार जक्कल-
सुतार यांची फाशी रद्द करण्यासाठी बुद्धिमान लोक
प्रयत्न करीत होते तेव्हा–)

५ जून १९८३

## जय फुलनमाता

जयदेवी जयदेवी फुलनदेवी
सत्ता डाकूवर विश्वास ठेवी ॥

गोळी माळ गळा बंदूकधारी
आमदार–नामदारांची तूच कैवारी ॥

शोधती पोलीस कडेकपारी
सत्ता अबला अन् सबला तू नारी ॥

जयदेवी जयदेवी फुलनमाता
तव दर्शन मात्रे हरली ' अर्जुन ' चिंता ॥

तवचरणी सत्ता ही ठेवीते माथा
चोर–डाकू–मंत्री गातील तव गाथा ॥

६ मार्च १९८३

## कन्यादान

स्वतःची जात सोडून त्याने
वरात परदारात नेली
परंपराप्रिय घरात
कन्या दान केली !
त्याला कळून चुकलं होतं
अंतिम पराजय आपलाच आहे
दलितांना मात्र वाटत होतं
' विजय ' आपलाच आहे !

१ मे १९८३

## वर्षा

आषाढातील पहिल्या दिवशी
घामाला पापडाची आठवण झाली
' लिज्जत 'दार लेखणी गरजली
कविता वाचून वर्षा बरसली

१७ जुलै १९८३

## दिवस

महावीरांचा महान देश
शिक्षकही त्यातला
पाच सप्टेंबरला सर्वांनी
दिवस त्याचा घातला

२५ सप्टेंबर १९८३

## गरज

मुलाच्या शाळेतील प्रवेशासाठी
आईने सोळा सोमवार केले
बापाने सोळा शनिवार केले
चिरंजीवाला सोबत घेऊन
दोघेही शाळेत गेले !

प्रिन्सिपॉल खिशाकडे बघत हसला
पाचशे रुपये ठेवताच
पोरगा वर्गात बसला !

पैशाची शाळेला गरज आहे
शाळेची पोराला गरज आहे
पोराची देशाला गरज आहे !

गरजेला पैशाची तहान आहे
आपला देश महान आहे !

३ जूलै १९८३

## ओढ

कशाला सोडू बंगला गाडी
दूरध्वनी सरकारी
लालबत्ती निघूनि जाता
धिःकारती अधिकारी !

१२ जून १९८३

## भेट

त्यांना एका देशाने
सुंदर चित्र भेट दिले
श्रेष्ठींनी ते भिंतीवर लावले
त्यांना ऑस्ट्रेलियाने
एक घोडा भेट दिला
श्रेष्ठींना प्रश्न पडला
केव्हा ?
कुठे ×× ×××× ?

३१ जुलै १९८३

## प्रीतीभोजन

शब्दकोषात प्रीतीभोजनाचा
अर्थ आला नवा
प्रतिस्पर्ध्याला पाचर मारण्याची
ही एक नवी दवा !

७ ऑगस्ट १९८३

## कुणाच्या खांद्यावर

अंतुलेंना उपरती
‘ ट्रस्ट शासनाचे हाती ’
झाले पाषाण सिमेंट
हसे रानातील माती
ऊसा ऊसाच्या कांड्याची
पात पात आज वाजे—
‘ कुणाच्या खांद्यावर
प्रतिष्ठानचे हे ओझे ? ’

## सूं–ले–’ले ?

कार्यक्षेत्राच्या मर्यादेमुळे
गुन्हेगार गुणवान झाला
नैतिकतेची ऐसी तैसी
न्यायाधीश धनवान झाला !

१४ ऑगस्ट १९८३

## दादा–व्यथा

आयोगाला विरोध केल्यास
प्रतिगामी ठरतात
पाठिंबा दिल्यास
जातीयतेची मुळे वाढतात
त्यामुळे—
आजकालचं नेतृत्व
अवघड जागेचं दुखणं आहे
जावईच डॉक्टर असल्यामुळे
सर्व दाखवणं कठीण आहे

२५ सप्टेंबर १९८३

## झडप

राजकारणात पैशाचा
महापूर आला
झडप घालून खुर्चीवर
तो महापौर झाला

२५ सप्टेंबर १९८३

## पोटासाठी

सीमा प्रश्नासाठी ते
दरवर्षी उपोषणाला बसतात
जे प्रश्न सुटत नसतात
त्यावरच नेते जगत असतात

२५ सप्टेंबर १९८३

# ही आमुची भारतमाता

आसाम पेटला
काश्मीरला खेटला
शिखांनी रेटला
पंजाबही ॥ १ ॥

परकीयांचे हात
लावतात आग
सिलोनलाही राग
भारताचा ॥ २ ॥

भारतद्वेषाने
वाजविला डंका
रावणाची लंका
जयवर्धनेची ॥ ३ ॥

समस्या गहन
तामिळींचे दहन
प्रेतांचे वहन
जागोजागी ॥ ४ ॥

आतून बाहेरून
देश हा जळतो
पुढारी पळतो
खुर्चीमागे ॥ ५ ॥

सांगा देवा आता
कोण असे त्राता ?
बुडविती भारता
स्व–पुत्रच ॥ ६ ॥

११ सप्टेंबर १९८३

## भोसला कुलदीप (?)

तिसऱ्या शक्तीची घोषणा करीत
अंतुले पुढे वाकला
' सुलताना 'ची कुबडी घेऊन
' छत्रपती ' उभा ठाकला
मराठ्यांनीच मराठ्यांना
नेहमी धोका दिला आहे
भावकीच्या द्वेषाने
शत्रूंना मोका दिला आहे !

२५ सप्टेंबर १९८३

## घोटाळा

अंतुले–भोसले हे दोघे बंधु
जेवत होते दही–भात–लिंबू
जेवता–जेवता घोटाळा झाला
ताटात ' उंदीर ' मुतून गेला

११ डिसेंबर १९८३

## डास

सर्व दिवाळी अंक चाळले
वस्त्रगाळ करून गाळले
फारच थोड्या अंकात होता
थोडा विनोद
थोडा उपहास
अनेक अंकात मात्र
एक कासव
एक डास

४ डिसेंबर १९८३

## अनुदान

सरकारी निवासात
आनंदाने राहतोस
अनुदानी पुस्तकाला
द्वेषाने का पाहतोस ?
' गाड ' नाहीतर ' गीळ ' द्वेष
नवोन्मेष टाळू नकोस
' गंगा 'धर डोईवर
गटारात लोळू नकोस

१८ डिसेंबर १९८३

## खरे जैन

जैन मुनी कशासाठी
उपोषणाला बसतात ?
राजकारण्यांची मते
वस्त्राने ‘ श्वेतांबर ’
मनाने ‘ दिगंबर ’च असतात

१८ डिसेंबर १९८३

## बाहु–बली

श्वेतवस्त्रधारी नीती
‘ डोंगर न्या स्मशानात ’
नेत्र पाणावले त्याचे
वस्त्रहीन पाषाणात ॥ १ ॥

नेता नेती पालखीत
जातिधर्म रुजवीत
‘ बाहु ’ यांचे ‘ बळी ’ घेती
‘ जाती ’ डोंगर तुडवीत ॥ २ ॥

रक्ताळलेल्या हातांनीच
हारतुरे सजतात
एका ‘ लाल ’ दिव्यासाठी
किती दिवे विझतात ? ॥ ३ ॥

१८ डिसेंबर १९८३

## आजार

दिल्लीहून ती मान–' सिक '
तपासणी करून यायची
शारीरिक तपासणीसाठी
बंगलोरला जायची
काही आजारासाठी
अनोळखी डॉक्टरच लागतात
अवघड दुखणे कुरवाळीत
नेते रात्रभर जागतात !

१८ डिसेंबर १९८३

## मते

सांगलीच्या मतदार संघात
काही मते वादाची होती
काही ' आत–ताई–पणाची '
तरी ' ती ' दादाची होती !

२९ जानेवारी १९८४

## आमचा अमिताभ

अमेरिकेहून 'अम्मा '
ब्रीचकॅण्डीला आली
राजभवनाला वळसा घालून
सांताक्रूजला गेली
तेव्हा—
एका टेक्स्टाईल मीलची चिमणी
दुसऱ्या चिमणीला म्हणाली—
" काल ' पंजा ' दाखवीत होती
आज पाठ दाखवीत आहे
काल रोटी दाखवीत होती
आज लाठी दाखवीत आहे
आम्हाला लाथाडण्यात
काय तिचा लाभ आहे ?
तिच्या घरात एकच
आमच्या घराघरात अमिताभ आहे
आमचा अमिताभ आजारी
त्याचा बाप कर्जबाजारी
बाकी सारं फाईन आहे
त्याच्या घशात गरिबीची नळी
हातात वीस कलमी सलाईन आहे.

१९८२

## अंतराळ

राकेश शर्माला अंतराळातून
' एक सफदरजंग ' रोड दिसला
तेव्हा एक ' तळीराम '
ग्लासात पाहून हसला--
' तो आजच गेला
आम्ही रोजच ' वर ' जातो.
अंतराळातूनच
कधी ' यमुने 'चे
तर कधी ' सह्याद्रि 'चे
भाषण खातो ! '

२९ एप्रिल १९८४

# अर्थसंकल्प

निवडणूक लाजत लाजत म्हणाली
‘ हे प्रिय, गळ्यात ‘ कर ’ नका टाकू
मला लाज वाटते ’
तेव्हा ‘ सुशील–प्रणय–मुख–मर्जी ’
म्हणाले
‘ डार्लिंग, जाणवणार नाही असा
‘ अधिभार ’ लावतो अन्
‘ उत्पादन केंद्रा ’––वरच ‘ कर ’
ठेवतो !

२५ मार्च १९८४

## घराणेशाही

‘ घराणेशाही ’ वाचून वाटलं
खरंच ‘ पत्र नव्हे मित्र ’ आहे
पण लगेच ‘ डोळा ’ म्हणला,
आत मुकुंद ‘ तळवलकरां ’चं
चित्र आहे !

२५ डिसेंबर १९८३

## अध्यक्ष

‘ सरस्वती ’ कोर्टात उभी
बाहेर ‘ लक्ष्मी ’ची खैरात आहे
कुठे बोरकरांची तर
कुठे खरातांची वरात आहे !

२९ जानेवारी १९८४

## सराफ

एक होता सराफ
‘ मनोहर ’ दिसायचा
नवीन ‘ दागिना ’ पाहून
‘ मनपसंत ’ हसायचा

१८ मार्च १९८४

## दामायण

अशोकवनातून परत येणाऱ्या
सीतेसारखी जेव्हा ती
ऑफिसमधून घरी येते
तेव्हा त्याला बससुद्धा
मारुतीसारखी वाटते.

आता तो धोब्याच्या कसल्याही शब्दाकडे
लक्ष देत नाही
अग्निपरीक्षा बँक बॅलन्समध्येच
भस्म होते.
जटायू बसमध्येच तिला
'टाटा' करतात, अशोकवनासाठी

शेजारीपाजारी भावासारखेच वागतात.
फक्त लक्ष्मणरेषेऐवजी
'लाईन' मारतात.

ती दाम कमावते
तोही दाम कमावतो
दाम नाकात दम आणतो.

दामासाठी जगलं पाहिजे
दामायण घडलं पाहिजे
सीता रोजच अशोकवनात गेली पाहिजे
दामायणासाठी !

१ जानेवारी १९८४

## शल्य

शौयपिक्षा भपक्याला
संपूर्ण देश फसला होता
एशियाडच्या मैदानावर
दमेकरी अमिताभ बसला होता
देशाचं दुर्भाग्य समजून
अप्पू मनात हसला होता

## मार

हॉकीत खाल्ला,
क्रिकेटमध्ये खाल्ला
म्हणून बोंबाबोंब कशाला ?
जो पदार्थ आवडतो
तोच आम्ही खाल्ला !

९ जानेवारी १९८३

## तोता

हॉकी पाहून कॉंग्रेसचा
वदला एक तोता
'पाकिस्तानचा साधा एक चेंडू
सरळ गोल करीत होता
मला वाटतं यामागे
'संघा'चाच हात होता.'

## ॲश–ट्रे

भारतीय क्रिकेट जेव्हा
पराभव चाटू लागला
विश्वचषक आम्हाला
'ॲश–ट्रे' वाटू लागला.

८ जानेवारी १९८४

## मार्क्सवादी

निवडणूक येताच प्रत्येक पुढारी
समाजवादी असतो
परीक्षा येताच प्रत्येक विद्यार्थी
' मार्क्सवादी ' असतो !

१७ एप्रिल १९८३

## लव्हाळी

श्रेष्ठीजवळी ' अडीच सी. एम्. '
बंडाचे गीत गाती
खासदार मोरे वदले—' दादा,
बांबू घ्या हो हाती ' ॥
काठीधारी दादांच्याहि
जखम वाहते जिव्हारी
बांबूच्याही बनात आता
जमली सर्व लव्हाळी ॥

१८ मार्च १९८४

## पर्वणी

निवडणुकीसाठी दिल्लीला
काळा पैसा जाऊ लागला
बॅग भरून सांडलेला
पुढारी खाऊ लागला
याच पैशाने आश्वासनांचे
पोष्टर्स हे छापणार आहेत
नंतर मात्र गरीबांचे
हातपाय कापणार आहेत.

१८ मार्च १८८४

## मोड

नास्तिकही आजकाल
परमेश्वराकडे चालू लागले
सुट्टी नाणी मिळविण्यासाठी
सत्यनारायण घालू लागले !

## सत्य

भिवंडी–मालेगाव खाली
समान नागरिक कायदा
जळत आहे
वेड पांघरून सरकार
सत्यापासून पळत आहे !

## व्यथा

सरकारी नपुंसकता
समाजाला यमा करी देते
रक्ताळलेले वर्तमानपत्र
रोजच घरी येते !

१७ जून १९८४

## जाग

गेली पस्तीस वर्षे
ते प्रतिगामी होते
जन्मशताब्दिला पुरोगामी झाले
सावरकरांच्या पुतळ्याला
काँग्रेसचेही हार आले

## दोन जन्मशताब्द्या

महाराष्ट्राच्या या नररत्नासाठी
जनतेचे हृदय सिंहासन होते
गडकऱ्यांसाठी जे सरकार होते
सावरकरांसाठी ‘ शासन ’ होते

१५ जुलै १९८४

## शंका

तेल गडप झाले
साखर महाग झाली
चिंतू म्हणाला आईला—
“ इतक्या लवकर दिवाळी आली ? ”

## ब्रम्ह—ज्ञान

पडद्यामागे ‘ ब्रह्मचारी ’
भोगानंद लुटत असतात
‘ योगा ’पेक्षा बंदुकीनेच
सारे प्रश्न सुटत असतात.

## भाई–भाई

काहीच कळत नाही.
कोण कुणाचा मित्र ?
स्मगलरच्या घरात
मंत्र्यांचे छायाचित्र !

५ ऑगस्ट १९८४

## स्मगलर

पोलिसांनी सतरा वेळा पकडले
न्यायाधीशांनी अठरा वेळा सोडले
कायद्याने शंभर वेळा पकडले
निवडणूक निधीने हजारवेळा सोडले
आम्ही मात्र न्यायाधीशांना व
नेत्यांना कोपरापासून हात जोडले !

## महावीर

कुणास वाटे वाल्मिकी ते
कुणास पैगंबर
कुणास वाटे महावीर
पाहूनि ते 'दिगंबर '
पोखरली जरी अर्थव्यवस्था
मंत्रीही गुण गाती
' काळ्या काळ्या ' झाडाखाली
' हिरवी हिरवी ' माती

२६ ऑगस्ट १९८४

## योग

डांगेंना आयुष्यात
जे जमलं नाही
ते नीळकंठ खाडिलकरांनी केलं,
शिवसेनेचं घोडं
साम्यवादाच्या दारात नेलं !

## शोधा

त्यांना ' प्रॅक्टिकल सोशॅलिझम '
सापडला.
ते पर्यायी मराठी शब्द
शोधत आहेत.
त्यांना ' पेपर टायगर '
सापडला,
ते खरा वाघ
शोधत आहेत.

२५ मार्च १९८४

## शिवसेना

उपसभापतीच्या निवडणूकीत
ती ' दादा 'कडे पाहून हसली
' मधुचंद्राच्या रात्रीलाच
बाजूला बसली !

## योग

एक प्रतिष्ठानात अडकला
दुसरा विमानात फडकला !
' चौदा ' मुखी परमेश्वराचा
धावा आहे,
बाकी काही म्हणा
दादांना गुरु अकरावा आहे !

१३ मे १९८४

## बॅरिस्टर (?)

अंतुले, भोसले, आदिक
इत्यादि तीन बॅरिस्टर उडाले
तेव्हा लॉ कॉलेजचे विद्यार्थी
विचारात बुडाले—
बॅरिस्टर व्हावं की ' दादा ? '

२७ मे १९८४

## तांबी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५४६
क्रमांक २५९९८
१५/११/९६

तीन वर्षांत तीन
मुख्यमंत्री झाले
तेव्हा दिल्लीच्या लक्षात आले—
‘ दो या तीन बस्स ! ’
त्यांनी—
बंडखोरांना तंबी दिली
महाराष्ट्राला तांबी दिली
‘ सी. एम्. ’च्या पाळण्याला
जराशी लांबी दिली

३ जून १९८४

## संस्कृती

जर मनी आलं तर
जर्मनीतसुद्धा करतात
त्यांनी विमानात केलं
बाकीचे जमेल तिथं करतात !
कुणी नेत्रसुख, कुणी गात्रसुख
कुणी फक्त प्यालेच भरतात !
त्यांचं उघडं पडलं
बाकीचे अजून झाकून आहेत !
संस्कृतीच्या ग्लासात
गांधीवाद टाकून आहेत !
कुणी दादापुढे तर कुणी
बाई पुढे वाकून आहेत !

३ जून १९८४

## आज

हिंदूंकडे शीख आता
द्वेषाने पाहू लागले
‘ अमृत ’सरच्या परिसरात
विष फक्त वाहू लागले

## उद्या

पंचवीसावं कलम आणि
हिंदूसुद्धा जाळतील
धर्मवेडे भारताची
फाळणी कशी टाळतील ?

## परवा

‘ पगडी ’साठी ‘ दाढी ’वाले
विनाकारण तापतील
‘ एकविसावं बोट ’ यांचं
पाकिस्तानी कापतील !

## स्वातंत्र्य

स्वातंत्र्याचा अर्थ कळेना
असे कुणाची चूक ?
हवालदाराच्या हातात काठी
संतांच्या बंदूक

## गुरु

धर्मद्वेष अन् देशद्रोहाचे
सर्वत्र पसरले लोण
गुरुच झाले गुंड पुंड
'पण—जाब' विचारील कोण ?

## मंदिर

दुष्ट पुष्ट मस्त जिथे
धर्म नष्ट आतला
सुवर्ण मंदिरात आज
रक्तपात मातला

८ जुलै १९८४

## कडकी

महिना अखेरची सकाळ
कडकीच्या कडक उन्हात
फूटपाथवर रेंगाळत होती
पर्स पुन्हा पुन्हा तपासली
तेव्हा म्हणाली
लाज नाही वाटत
सारखा सारखा हात फिरवता
कुणी पाह्यलं तर ?

१९८४

## अनुकरण

मुंबईचेच अनुकरण करीत
पुणे पुढे पुढे जात आहे
जोशी भावे दारात उभे
' रामा शेट्टी ' आत आहे.

## लेट फी

भिन्द्रानवालाने पंजाबात
मानवता नाकारली
त्याला उशीरा पाठविल्याबद्दल
चित्रगुप्ताने
निरपराध जिवांची
लेट फी आकारली

१९८४

## उरण

गोळीबार पाच ठार
पेटले उरण
ठायी ठायी असे
शेतकऱ्यांचे मरण
सत्तावीस हजारांचे
होती पाच लाख
सिडकोच्या नफ्यासाठी
भूपुत्रांची राख !

१२ फेब्रुवारी १९८४

## ग्रीन झोन

वेश्यांच्या परिषदेत
एक नवा प्रस्ताव आला,
मंत्र्याच्या गाडीमुळे
लाल दिवा बदनाम झाला.
येथून पुढे महासतींनो
हिरवा दिवा लावू या,
'रेडलाईट' एरियातून
'ग्रीन झोन'मध्ये जाऊ या.

१५ सप्टेंबर १९८५

## तक्रार

मी म्हणालो—
‘ आपण सुखाचं वाचन करू
नंतर वाचनाचं सुख घेऊ ’
ती म्हणाली—
‘ हा का चर्चेचा विषय ?
तुम्ही मित्र नव्हे पत्र आहात ’

२४ जून १९८४

## पर्याय

सारस्वतांची जिव्हा ‘ मधु ’ होती
परंतु तिच्यावर ‘ सु—भाष ’ नव्हता,
त्यांनाही खूप चढली होती
त्यांचाही पण उपाय नव्हता,
‘ जयवंत ’ जाहली मदिरा जेव्हा
फेकण्याशिवाय ‘ पर्याय ’ नव्हता !
खुशाल फेका, मारा प्याले
लेखण्यांचेही होऊ द्या भाले
आदिक—अंतुले आणि भोसले
सारस्वतांच्या नजदीक आले !

१७ फेब्रुवारी १९८५

## शल्य

लोकप्रतिनिधी चालक आहे
नोकर फक्त वाहक आहे
तरीसुद्धा मतदारांना
रोजचा दिवस दाहक आहे.

## समस्या

नालायक लोकप्रतिनिधी
निवडणुकीत पाडता येतो
पण नालायक सरकारी नोकर
बदलीशिवाय कुठे गाडता येतो ?

## मायबाप

बुद्धिवंत मंडळीच
व्यभिचार शिकली
स्कॉच व्हिस्कीसाठी त्यांनी
सरकारी गुपिते विकली
डॉक्टर, वकील, इंजिनिअर
जमेल तिथे खात असतात
वरपर्यंत या साऱ्यांचे (साल्यांचे)
पोचलेले 'हात' असतात
'चर—खा', 'नांगर—धारी'
सारेच यांचे बाप असतात
पुढारी आणि सरकारी नोकर
मतदारांना ताप असतात
निवडणूक जवळ आली की
नागपंचमीचे साप असतात !

३ मार्च १९८५

## तिकीट

पक्षापेक्षा आसनावरच
त्यांची होती निष्ठा
तिकिटासाठी गर्दीत घुसले
घाईत फिटला काष्टा
धोतराची लुंगी झाली
लुंगी आकाशी उडाली
आमदार निवासात
स्वप्ने ग्लासात बुडाली !

२४ फेब्रुवारी १९८५

## आमचा निर्णय

बारा गावची बारा टाळकी
प्रत्येकाच्या नाना तऱ्हा,
‘ बारा–मती ’ मंदांपेक्षा
तडफदार राजीव बरा !

## नीती

खाद्य तेलातील भ्रष्टाचारी
सुरेश जैन चांगला
‘ आय ’ने टाकलेला कचरा
शरद ने गळ्यात टांगला

## भूक

इकडेही बंड
तिकडेही बंड
तिकिट मिळताच
आत्मा थंड !

१० मार्च १९८५

## लेखक

लेखक ' मध्यरात्री ' मुंबईत
गोलपीठ्यावर फिरू लागले
' एनर्जी 'च्या गोळ्या विकत
बेडरूम्समध्ये शिरू लागले !

काही रथी–महारथी
' पापडा 'साठी भटकू लागले
काही फासावर लटकावं तसं
कॅलेंडरवर लटकू लागले !

' काल–निर्णय ' त्यांच्या हाती होता
आज ते परावलंबी आहेत
काल ' अर्थ ' वाटण्यासाठी होता
आज ' अर्थावलंबी ' आहेत !

शरीराचा ' वरचा पार्ट '
भाड्याने हे देत असतात
तरीसुद्धा लोक यांना
XX कधी म्हणत नसतात !

# मार्ग

कुणी लिंबे कलिंगडे कुणी
साहित्यिक विकती
स्वतःला सुद्धा जे विकती
जगात या टिकती ॥ १ ॥

शरीर मन अन् साहित्यही
ते आपुले का मानावे ?
जो जो जे जे मागेल त्याला
आनंदे दान करावे ॥ २ ॥

वेगवेगळ्या रंगांच्या त्या
घाला डोई टोप्या
गल्लीतून दिल्लीशी जावे
मार्गाने या सोप्या ॥ ३ ॥

शाई सांडून जे जे जगती
रद्दी डोईवर नेती
'शॉर्टकट 'ने ' कलिंगडे ' पण
मांडीवर येती ॥ ४ ॥

१४ एप्रिल १९८५

## आखाडा

बारामतीच्या वस्तादाचे
शिष्य जोरात ओरडत होते
सांगलीवाल्याचे चेलेसुद्धा
त्यांच्या अंगावर पडत होते
विधानसभेच्या आखाड्यात
राज्यपालांचे भाषण सडत होते

पहिलवान आमदार झाले
कुस्त्या पाहणे नशिबी आले !

पूर्वी टोपीखाली डोकं होतं
डोक्यात विचार होते
आजकाल
लंगोटात ' सर्व काही ' आहे
लोकशाहीवर चढण्याची
प्रत्येकाला घाई आहे !

२१ एप्रिल १९८५

# मासा

त्यांनी ढोल वाजविले—
' तो महाराष्ट्राची अस्मिता आहे '
त्यांनी टिर्ऱ्या बडविल्या—
' तो महाराष्ट्राची शान आहे '
आम्ही मात्र सांगत होतो—
' हे बगळ्याचे ध्यान आहे
तळवलकर—गडकरी
आणि कंपनीचे
बाजारातील दुकान आहे '
तरी सुद्धा त्यांनी त्याचा
उदो उदो केला
तो मात्र वळणाप्रमाणे
जातीवरच गेला
आता तो वागणार आहे
राजीव सांगेल तसा
जळाविना मासा
जगेल कसा ?

२३ जून १९८५

## वरमाई

सांगलीवाल्याने ठेवणीतला
धोबी पछाड टाकला
आत चाललेला शरद
दारातच उभा ठाकला
निलंगेकरांनी आकसाने
विलासला झाकला
गटबाजीच्या राजकारणापुढे
शिवाजीचा घोडा वाकला
द्वेष आणि सूडबुद्धीचे
राजकारण उशाला
वरमाईच छिनाल
मग . . .
करवाल्यांना दोष कशाला ?

१४ जुलै १९८५

## बम्बई

मराठी माणूस फेकला गेला
महाराष्ट्राला अवकळा आली
पाहता पाहता मुंबईची
पंचवीस वर्षांत ' बम्बई ' झाली

आणखीन पंचवीस वर्षानंतर
मराठ्यांचे स्मारक दिसेल
गिरगावातील शिलालेखावर
फक्त पुढील मजकूर असेल--

' इस स्थानपर
बम्बई का अंतिम मराठा
बटाटावडा खाते खाते
अल्ला को प्यारा हुआ । '

जय बम्बई !
जय इंडिया माता ! !

१६ जून १९८५

## पर्याय

पंजाबचा प्रश्न सुटला
जल्लोषाला पाझर फुटला
खासदार—नामदारांनी
' भांगडा ' केला
अतिरेकी आता नक्कीच मेला (?)
आम्हाला एक शंका आली
सीमा प्रश्नाची अशी
का गत झाली ?
आपण सर्वांनी ' कॅबरे '
केला पाहिजे
सीमा प्रश्न तडीस नेला पाहिजे

२५ ऑगस्ट १९८५

## सवलत

एक होती आवा
तिला भेटला बुवा
बुवा म्हणाला कवा ?
ती म्हणाली—
म्हणताल तवा
मांडवात लावा
रजीस्टर लावा
म्होतूर लावा
नायतर तशीच ठेवा

१९६४

## माशी

एक होती माशी
दूरदर्शनला समजायची काशी
बातम्यांची ' भक्ती ' करायची
व ' स्क्रीन 'वर येऊन चरायची ॥

## फुलराणी

आयुष्यभर आम्ही रंगभूमीवर
' फुलराणी 'ची भक्ती केली,
तिने मात्र लग्न करून
' पळी पंचागा 'ला मुक्ती दिली

## पुरोगामी

नादिराच्या आयुष्यातून
नवरा बाद झाला
राष्ट्रसेवादलाच्या शिक्षणातून
नवा समाजवाद आला
करदोडा, जानवं नसलेली
मंडळीसुद्धा रडली
महाराष्ट्राची 'अ–स्मिता'
राजबब्बरच्या गळ्यात पडली.

१५ सप्टेंबर १९८५

## जागरण

आमदार निवासात
काही डोळे जागत होते
पिंडाला कावळा शिवण्यासाठी
'लाल दिवा' मागत होते!

८ सप्टेंबर १९८५

## मुदत

अनेकांच्या कोपरांना
मधाचे बोट लावून
ते दिल्लीला गेले
'पी.एम.'ना न भेटताच
त्यांनी सांताक्रूजला आगमन केले
तेव्हा एक हवाई सुंदरी
दुसरीला म्हणाली–
"नव्या लाल दिव्यांची
यादी परत आली,
यादी वाचता वाचता
मुदत भरत आली!"

१५ सप्टेंबर १९८५

## गाव तसं चांगलं पण—

मतदारांची डोकी
'टोप्यां'पेक्षा चांगली
पाटलाला ठोकर
अन्
पवारामागं सांगली !

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५४६

'दादा' तसा चांगला
पण
नात्यागोत्यातच रंगला
मतदार लांब पांगला
'पुतण्या' भूखंडावर टांगला !

जावळी तशी चांगली
पण
'बारामती'ची अब्रू
तिने वेशीवर टांगली !

शिंगणापूर तसं चांगलं
पण
'आय' 'एस'ला चावलं
अन्
बंडखोरामागं धावलं !

गाव तसं चांगलं
पण
निवडणुकांना त्रासलं
काळ्या पैशाच्या प्रचारानं
लोकशाहीला ग्रासलं !

१९८६

## जयजयकार

त्याने सिमेंटची थैली खाली
याने खाली धारावी
आम्ही आता आरशात पाहून
आमच्याच श्रीमुखात मारावी
डोकं जेव्हा गरगरतं
'स्वीच ऑफ' करावा
जयजयकार करण्याचा
मार्ग फक्त पत्करावा

शरदला नेता निवडणाऱ्या
'भाजपा'चा जयजयकार
'भाजपा'ला सवत मानणाऱ्या
'जनता'चा जयजयकार
'जनता'ला सावत्र बहिण मानणाऱ्या
'शे. का. प.'चा जयजयकार
भांडवला अभावी वर न येणाऱ्या
कम्युनिस्टांचा जयजयकार

'पुलोद'चा जयजयकार
'काँग्रेस'चा जयजयकार
काँग्रेसच्या मांडीवर बसणाऱ्या
दलितांचा जयजयकार
गठ्याने मतदान करणाऱ्या
मुसलमानांचा जयजयकार
गावात किंमत नसलेल्या
अल्पसंख्य हिंदुंचा जयजयकार
'छत्रपती'च्या नावाने जगणाऱ्या
बागायतदारांचा जयजयकार
दलीतांसारखेच जीणे जगणाऱ्या
जिरायतदारांचा जयजयकार

सरकारी नोकऱ्यांवर लोंबकळणाऱ्या
साडेतीन टक्क्यांचा जयजयकार
नफेखोर साठेबाज
व्यापाऱ्यांचा जयजयकार
निवडणूक लढविणाऱ्या
उमेदवारांचा जयजयकार
पैसे घेऊन मत देणाऱ्या
मतदारांचाही जयजयकार

हप्ते देणाऱ्यांचा उदोउदो करणाऱ्या
पत्रकारांचा जयजयकार
शाळेत झोपणाऱ्या
व शिकवणीत कमावणाऱ्या
शिक्षकांचा जयजयकार
चार कविता लिहून
समाजसुधारक बनलेल्या
गावठी क्रांतीकारकांचा जयजयकार

इतक्या रामायणानंतर
'राजीव देशाची गरज'
समजणाऱ्या आमचाही
ज--य--ज--य--का--र !

२९ सप्टेंबर १९८५

## व्यथा

पुण्याचा महापौर
कल–माडीच्या पाया पडला
तेव्हा शनवारवाडा
पर्वतीजवळ जाऊन रडला—
" ताई, ताडीवाले माडीवाले
परमीटवाले येणार आहेत
पुण्याची अस्मिता
ओंकारेश्वरला नेणार आहेत !
सुरतवाला, बनातवाला
बंगलोरवाला येतील
सह्याद्रीचे दगडधोंडे
सीमापार नेतील !
सदाशिव पेठेला आज
अवकळा आली आहे
' पुणेकर मंडळी ' आता
' पूनावाला ' झाली आहे !
नंबर दोनची घरे आज
सर्वत्र लखलखीत आहेत
प्रत्येक पक्षाचे नेते
व्यापाऱ्यांच्या पालखीत आहेत !
खासदार आमदार
बाई सारखे ठेवत असतात
गळ्यात गळा घालून
व्यापारी जेवत असतात ! "

* * * *

पर्वतीने डोळे पुसले,
" भाऊ, रडून उपयोग काय ?
नोकरीच्या शोधात असतात
मराठी तरुणांचे पाय
बापजन्मी कधी यांना
व्यापार नीट जमला नाही
व्यापाऱ्यांचे जोडे पुसण्यात
मराठा कधी दमला नाही !
मूठभर बागाईतदारांना
जातीचा माज असतो,
ज्याच्या खिशात पैसा
त्याचाच आवाज असतो.
येथून पुढील महापौर
पैसाच ठरविणार आहे
पुण्यातील 'लक्ष्मी' रोड
'सदाशिव'ची जिरविणार आहे !
हळूहळू माझ्या छातीत
लोखंड–सिमेंट घुसत आहे
तरीसुद्धा भाऊराया
मी तुझेच डोळे पुसत आहे ! "

८ जून १९८६

## संस्कृती

उसवलेली संस्कृती
हळूहळू फाटू लागली
तेव्हा
गावातील वडारीणसुद्धा
मंदाकिनी वाटू लागली

## आवड

काही बऱ्या, काही वाईट
फिल्मोत्सवात फिल्म होत्या
आपआपल्या संस्कृतीची
कर्मकहाणी सांगत होत्या,
मराठीच्या नटया तेव्हा
घरी उवा मारीत होत्या !

## काय ‘ हे–गडे ? ’

तुझीच सत्ता
तुझी कंपनी
तुझीच रे बाटली ।
पीपातील तो
‘अरक ’ ओतता
लाज तुला वाटली ॥ १ ॥
काय ‘ हे–गडे ’
थकता तुम्ही
उडून चालली रात ।
‘ राम–कृष्ण ’
सोडून धरू का
राजीवचा मी ‘ हात ’ ॥ २ ॥
पुन्हा तिच्याशी
घटस्फोट अन्
पुन्हा तिच्याशी लग्न ।
पुन्हा पुन्हा
बोहल्यावर चढुनि
‘ जनता झाली नग्न ॥ ३ ॥

१९८६

## ‘ लघु ’तम शंका

भरल्या ताटात पडली पाल
जयपूरहून आलं टपाल
खंडीभर वरणात
रुतला राज्यपाल

## काल आणि आज

धरण खाल्ले रस्ते खाल्ले
तेव्हा सारे गप्प होते ।
चार मार्क्स इकडे तिकडे
त्याने शासन ठप्प होते ॥

## भूक

त्याचे आज उघडे पडले
एरवी काय घडत असेल ?
विद्यापीठातील हरामखोरांच्या
घशात काय पडत असेल ?

१६ मार्च १९८६

## रंगपंचमी

प्राध्यापकांचे हात काळे होते
विद्यापीठाचे डोळे लाल होते
याच रंगात बुडणारे
आमचे राज्य'पाल' होते ॥ १ ॥
अर्थ संकल्पाच्या पिचकारीत
'सोलापूर'चाच रंग होता
'यवतमाळ'चा 'सुधाकर'
'एकच प्याल्या'त दंग होता ॥ २ ॥
नऊ महिन्यांचे दुखणे
लातुरकर विसरले होते
'विलासी' आकाशात
सप्तरंग पसरले होते ॥ ३ ॥
'नांदेड'च्या हौदात
साखर सम्राट बुडाले होते
'निलंग्यां'चे शितोडे
'जयपूर'वर उडाले होते ॥ ४ ॥
एकमेकांच्या अंगावर
लोक रंग टाकत होते
आमचे रंगहीन हात
बहुरंगी डोळे झाकत होते ॥ ५ ॥

३० मार्च १९८६

# प्रार्थना

प्राध्यापकांनी पेपर फोडले
मंत्र्यांनी मार्क्स खोडले
जेलरने कैदी सोडले
आम्ही डोळे झाकून सर्वांना
कोपरापासून हात जोडले–

"देवा !
मंत्र्यांना बुद्धी दे.
बुद्धीला संस्कृती दे.
संस्कृतीला सेवा दे ।
आमच्यासारख्या पामरांना
'सोभराज'चा मेवा दे ॥"

येईल आम्हा गुंगी
खाता सोभराज मिठाई
विसरून जाऊ 'गर्द–दर्द'
दुष्काळ अन् महागाई ॥

२३ मार्च १९८६

## व्यथा

मुंबई पोलिसांचे 'झेंडे'
गोव्यावर फडकले होते
बिन झेंड्याचे 'दांडके'
हप्त्यात अडकले होते ॥ १ ॥
पोलिसांची बहादुरी
गुंडांना पकडत असते
निवडणूक निधीमुळे
बेडी ढिली पडत असते ॥ २ ॥
मंत्र्यांच्या आजूबाजूला
'सोभराज' राज्य करतात
नाकासमोर जगणारे
व्यवहारात त्याज्य ठरतात ॥ ३ ॥
श्रीमंत आणि राजकारणी
गुंडांना जगवत असतात
गल्लीगल्लीच्या नाक्यावर
नवे 'सोभराज' उगवत असतात ॥ ४ ॥

१३ एप्रिल १९८६

## कुंकवाचा धनी

ती 'अर्जुना'च्या पाठी
काय करील त्रिपाठी
राजीव देवानं बांधल्या
अशा जन्माच्या गाठी

ती नांदना, नांदना
तिला 'अर्जुना'ची फूस
सांग राजीव बाबा रे
कशी उजवावी कूस ?

ती उंडारे सर्वत्र
हा नावाचाच पती
घटस्फोटाचा विचार
करीतसे कमलापती !

१८ मे १९८६

## सुतक

विधानसभा दोनदा विधवा झाली
तशातच रौप्यमहोत्सव आला
ती बाजूला बसली
तो गजरा घेऊन आला !

१८ मे १९८६

## गिनती

आंध्रचे एकशेसाठ आमदार
त्यांनी अनेक वेळा मोजले
प्रत्येक वेळी ते ' बारा 'च भरले
राष्ट्रपती थोडे मागे सरले—
' रामलाल को आने दो
हमे गिनती नही आती '

३० सप्टेंबर १९८४

## दर्द

कोना प्रभाकर का सिंदूर
कोने में पडा था
दूसरी बारात लेकर
नया दूल्हा खडा था
तब
'असेंब्ली' 'शरमा'कर बोली—
"हे 'दयालू' 'शंकर'
यह कौनसी नीती
एक साल में तिसरा पती ?
अब जल्द विधवा न कर
वरना
तेरी कसम जाऊंगी सती !"

६ एप्रिल १९८६

## तेरी ‘ गंगा ’ मैली

गाडगीळांचा गंगा आगाऊ
बोलत होता ‘भाव–खाऊ’
त्याला वाटलं मस्का मारून
शरदच्या जवळ जाऊ
परंतु
शरद ही तापला
‘एस. बी.’ने चापला
गंगाच्या नाकाचा
शेंडाच कापला !

## दोन लेखक

दोन लेखक एकमेकांना
मनातल्या मनात सोलत होते
पोटात होती कटुता तरी
वरून गोड बोलत होते
एक ‘विजयी’ दुसरा ‘मनोहर’
एका ताटात जेवत होते
भातावर कढी अन्
मनात अढी ठेवत होते

४ मे १९८६

## कुंभमुळा

व्ही. आय. पी.चा घोळ
काहींना शेवटची अंघोळ
कुणाला दूषण ?
एकविसाव्या शतकाकडे
गंगेचे प्रदूषण

## समाजवाद

बामणानं मटण महाग केलं
दलितानं पुस्तक महाग केलं
समाजवादाचं ओझं
एकमेकांच्या दारात नेलं
त्यात आपल्या काय बापाचं गेलं ?

१ मे १९८३

## बामनाळलेला

साडेशहाण्णवची ' लक्ष्मण ' रेषा
ओलांडून तो ताठ ' माने 'ने
साडेतीन टक्क्यात घुसला
साडेतीन पावणेचार झाले
सव्वा शहाण्णवला त्याची ' दया ' आली
'पवारा 'च्या आळीत बोंबाबोंब झाली—
' पोरगं जातीबाहेर गेलं
पोरगं बामनाळलं ! '

२० मार्च १९८३

## भारत कधी कधी माझा देश आहे

भारत कधी कधी माझा देश आहे
आम्ही सारे भारतीय
अलग अलग आहोत
माझं आयुष्य
हा काही राष्ट्रीय एकात्मतेचा प्रबंध नाही
त्यामुळे अन्य जाती धर्माशी
माझा काडीचाही संबंध नाही
माझ्या जातीचा माणूस
माझ्या धर्माचा माणूस
हाच माझा भाऊ आहे
माझा देश माझा खाऊ आहे
खाऊन खाऊन तो संपणार आहे
प्रांता प्रांताची जुंपणार आहे
जुंपल्यानंतर फाटतील
एकमेकांना लुटतील
पुन्हा नवे परकीय
साम्राज्यवादी येतील
पुन्हा नव्या स्वातंत्र्य संग्रामासाठी
नवे टिळक नवे गांधी होतील

त्यांचेही पुतळे उभे राहतील
पुतळ्यावर कावळे बसतील
खुर्चीवर बगळे बसतील

पुन्हा आम्ही एक होऊ
स्वातंत्र्याचे गाणे गाऊ–
'हम सब एक है
हिंदु–मुस्लीम भाई भाई
हिंदु–सीख भाई भाई
हिंदु–इसाई भाई भाई
हिंदु–बौद्ध भाई भाई
हिंदु–जैन भाई भाई
हिंदु–हिंदु
सुद्धा भाई भाई

तोपर्यंत मित्रांनो
मला माझ्याच स्वप्नांची तहान आहे
या देशापेक्षा मीच महान आहे
मी माझ्याचसाठी जगतो
मी माझ्याचसाठी मरतो
आरशात पाहून
मी मलाच नमस्कार करतो
तेव्हा–
माझा जयजयकार असो
माझ्या धर्माचा जयजयकार असो
माझ्या पंथाचा जयजयकार असो
माझ्या प्रांताचा जयजयकार असो
झालंच तर
कधी कधी
माझ्या देशाचासुद्धा
जय–जय–कार असो

## चांग भलं

सकाळ— कधीकाळी भगवा झेंडा
अटकेपार फडकला होता
म्हणूनच यांचाही जीव
दिल्लीतच अडकला होता.
दुपार— दिल्लीतून गल्लीत आले
गल्लीतून घरात आले
घरातही एकटेच आता
बाटलीचा ग्लास झाले
संध्याकाळ—सत्ता संपत्तीची आस
मुलाबाळांची पैदास
मना जाळत जाळत
अशी आत येत आहे
कधी उसाच्या मळीचा
कधी खादीच्या कांजीचा
वास घेत घेत आत्मा
पैलतीरी जात आहे

## रात्र

पैलतीरावर कुणी
रचताहेत सरण
सरणावर हा आत्मा
आज शोधे कण कण
कणा कणात पेटलं
या देहाचं सरपण
ढासळले हारतुरे
मनी हसलं सरण
ग्लास हातचा सुटला
खाली पडून फुटला
फुटलेल्या काचातून
एक सूर उमटला—
'तुझा कावळा होईन
तुझ्या पिंडाला खाईन
पुनर्जन्म मी घेऊन
लोकसभेत जाईन
लोकसभेत जाऊन
पुन्हा भाषण देईन
पुन्हा पेपरात फोटो
फोटोखाली आश्वासन
आश्वासनात शासन
शासनात हे आसन
आसनातच बसून
टोपी घालून हसेन्'

पुन्हा नवीन कावळा
त्याचा नवा नवा पिंड
नव्या नव्या पिंडासाठी
रोज निघे अशी धिंड
धिंडीसाठी गर्दी लागे
गर्दीसाठी आत्मा जागे
जागरणासाठी ग्लास
ग्लासासाठी सोमरस
सोमरसात बुडाली
सारी जगण्याची आस
आस उडाली आकाशी
ग्लास रिकामा तळाशी
तळागाळाच्या लोकांचं
देव करो आता भलं
सारे उचलणारे ग्लास
म्हणा म्हणा चांगभलं
चांगभलं
चांऽऽ ग भलंऽऽऽ

(मराठी माणूस ग्लासाला ग्लास लावताना 'चिअर्स' या इंग्रजी शब्दाऐवजी 'चांगभलं' हा अस्सल मराठी शब्द वापरू लागला तर . . .)

# दोन मिनिटे

काल रात्री अकरा वाजून अठ्ठावन्न मिनिटांनी
माझ्या दारात एक सुंदर तरुणी आली.
होती सुंदर, देखणी,
पण वयाने जरा लहान वाटत होती.
मी तिला तिचं वय विचारलं
तेव्हा ती म्हणाली–
' तारुण्याला कुठं वय असतं ?
तरी सांगते–
सतरा वर्षे, अकरा महिने, एकोणतीस दिवस,
मी म्हणालो–
' दोन मिनिटांनंतर परत ये.
अठराची होशील.
कायद्याने सज्ञान होशील.
मग रात्रभर भारताच्या सज्ञान भविष्य–
काळाला जन्म देण्याचा आपण प्रयत्न करू. '
ती उपहासात्मक हसली.
आत आली व खुर्चीत बसली.
म्हणाली–

' आज सकाळीच एका पुढाऱ्याकडे गेले होते.
तोही म्हणाला, तू उद्या ये.
अठराची होशील,
कायद्याने सज्ञान होशील.
मग मतदारयादीत तुझं नाव घालतो
व मुंबईला नेऊन तुला दिल्ली दाखवतो.
तो तर मेला पुढारी होता.
आपण बुद्धिवादी आहात.
आजपर्यंत माझ्या आयुष्यात
दोन मंत्री,
चार खासदार,
आठ आमदार,
सोळा झेड. पी.,
बत्तीस सरपंच,
चौसष्ठ कलाकार,
एकशे अठ्ठावीस कवि
आले आहेत.
कित्येक वेळा त्याचा अधःपात
तर दोन वेळा माझा गर्भपात झाला आहे
आता मला सारं कळतंय.
वळणाचं पाणी वळणाला वळतंय.

लहानपणी वाटायचं—
वस्त्र नेसण्यासाठी असतं.
आता मला कळतंय—
ते कशासाठी असतं.
लहानपणी वाटायचं—
छाती बाळाला दूध पाजण्यासाठी असते,
आता मला कळतंय—
सत्ता आणि संपत्तीने मदांध झालेल्या
वाघांच्या पंज्यासाठी असते.
लहानपणी वाटायचं—
तारुण्य हे कुणाच्या तरी
उंबरठ्यावरचं माप ओलांडून
गृहलक्ष्मी होण्यासाठी असतं.
आज मला कळतंय—
ते पैसे फेकणाऱ्या हाताच्या
शय्येवर कलंडण्यासाठी असतं.
आज मी मुलगी नाही,
आज मी बाई आहे.
बाईच्या हातात देशाचा इतिहास आहे.
सज्ञान—अज्ञानाची वयोमर्यादा
हा नागरिकशास्त्राचा विषय आहे.
विषय माझा धंदा आहे.
गादीवर कोणत्याही रंगाचा झेंडा अंथरा,
सर्व रंगाचे झेंडे मला आवडतात.
झेंड्याचा रंग तुम्हाला पाहायचाय.
मला तर आजची रात्र छताकडे
व आयुष्यभर आकाशाकडे पाहायचंय.
विचार कसला करता ?
घरी पस्तीस वर्षांची माझी आई
माझी वाट पाहतेय.
तिचासुद्धा जन्म
पंधरा ऑगस्ट एकोणीसशे सत्तेचाळीस
रोजीच झाला होता.
तिच्या एक कोटी झोपड्या आहेत,
दहा कोटी खोपड्या आहेत.
मूठभर तांदळासाठी
त्या माझी वाट पाहत आहेत.'
ती जवळ आली होती
तिच्या डोळ्यात लाली होती
व दोन मिनिटे झाली होती.

१५ ऑगस्ट १९८२

## परंपरा

परंपरेने
डोक्यावरचे केस मागीतले
व हळूच कानात सांगीतले—
‘ घाबरू नकोस
नवे येतील ’
मी म्हणालो—
‘ नवे येतील
पण ते सुद्धा
याच श्रद्धा पुढे नेतील ’
परंपरा हसली
एका कावळ्याजवळ जाऊन बसली
म्हणाली—
‘ काळं असण्यात काय पाप ?
थोडावेळ समज.
हाच तुझा बाप ’
मी दचकलो
म्हणालो—
‘ मी विज्ञाननिष्ठ आहे ’
परंपरा म्हणाली—
‘ मी संस्कृती जोपासण्यात
दक्ष आहे.
आपल्या संस्कृतीचं एक तत्त्व आहे
महत्त्वाच्या प्रसंगी
मोरापेक्षा कावळ्याचंच महत्त्व आहे ’
मी म्हणालो—
‘ त्यात कसलं आलय महत्त्व ?
मोर सर्वत्र उपलब्ध नसतात
म्हणून संस्कृतीचे ठेकेदार
कावळ्यापुढे स्तब्ध असतात ’

तोच झाडावरून कुणीतरी हसलं
तो भविष्यकाळ होता
तो म्हणाला—
' ही संस्कृतीची कथा
विज्ञानाची व्यथा
कुणापुढं टेकवशील माथा
कुणाच्या पाठीत हाणशील लाथा ?
एकदा तू सुद्धा गेलास की
रडतील
पडतील
दहाव्याचा पिंड
त्या कावळ्याला घालतील
तो कावळा
तुला ओळखत देखील नाही
तुझ्या पोरांचा बाप होईल
तुझ्या नावानं पिंड खाईल
फांदीवर बसून उडून जाईल
घरी एक फोटो टांगतील
अस्सा अस्सा होता
म्हणून जगाला सांगतील
अन् सुख धाऊन आलं कि
सारेच पांगतील
कावळे लेकाचे '
तेव्हापासून सर्वत्र मला
कावळेच दिसू लागले
काहींच्याकडे मी
तर काही माझ्याकडे पाहून हसू लागले
व पुन्हा पुन्हा
परंपरा गोंजारीत
विज्ञानाच्या मंडपातच बसू लागले

## ऑन् तू ले !

जिनकी उपर निष्ठा थी
उनको प्रतिष्ठा मिली
जिनको प्रतिष्ठा मिली
उन की प्रतिभा ने
उन्हें प्रतिष्ठान दिया
जिनको प्रतिष्ठान मिला
उनको चंदा मिला
राजनीती के साथ–साथ
नया धंदा मिला !

परमीट उनके हाथ में थे
इसलिये चंदा देनेवाले
उनके साथमे थे

आपके हाथमें क्या है–
भारतका भविष्य ?

उन्होंने गरीबोंको रोटीका चित्र बताया
आप क्या दिखाओगे—
' सॅण्डविच ' का ?

जब वे थे, तब वे भी खाते थे
अब ये है, ये भी खाते है
खाने की चीज है खाते है !

कोई कॅशमे ऑन खाता है
कोई ' ऑन ' में ' चेक ' खाता है
चुनाव इन्हे खाता है
ये चुनाव के लिये खाते है

चुनाव नही होता तो
कौन यहाँ आता ?
चुनाव के नामपर कौन नही खाता ?

गर यह जहर है
तो आप इतनाही समझ लिजीये
गरीबोंके लिये बेचारे जहर खा रहे है !

जो खाता है वह गाता है
अल्लाह के नामपर दे दाता
परमीटके नामपर दे दाता—
अल्ला परमीट है, परमीट अल्ला है
सब कुच खुल्लम खुल्ला है
चलो हम भी खा लेंगे
प्रारंभ से अंत तक खा लेंगे

प्रारंभ मै लेता हूँ
अंत तू ले
अंत तू ले
ऑन तू ले
ऑन तू ले !

१५ ऑगस्ट १९८२

## कटपीस

था बेच रहा
कटपीस हाथ पर
कोई बनिया
फूटपाथ पर
पब्लिक को उसने टटोला
चिल्ला चिल्ला कर वह बोला—
क्यों जाते हो भय्या दुकान में
क्या रखा है वहाँ थान में
पूरा थान न ले पाओगे
काट के कपडा ले जाओगे
कपडे को काटेगा दर्जी
जैसी होगी उसकी मर्जी

बोलो अम्मा
बोलो भाई
कटपीसकी इस दुनिया मे
चीज कौन सी अखण्ड आई ?
पर्ण, फूल, डाली के टुकडे
वृक्षों ने बाहों मे पकडे
इसी वृक्ष को काट काटकर
टेढी सीधी छॉट छॉट कर
फर्नीचर बन गया हमारा
कटपीस का है खेल ये सारा
बूंद कटपीस है धारा की
धारा कटपीस है बादल की
बादल कटपीस है सागर का
सागर कटपीस है धरती का
धरती के कटपीस को कहते
" देश हमारा ! देश हमारा ! ! "

देश के कटपीस को कहते
" प्रांत हमारा ! प्रांत हमारा ! ! "
प्रांत के कटपीस को कहते—
" जिला हमारा ! जिला हमारा ! "
जिले के कटपीस को कहते—
" गाँव हमारा ! गाँव हमारा ! "
गाँव के कटपीस को कहते—
" घर है मेरा ! घर है मेरा ! "
घर के कटपीस को कहते—
" तन है मेरा ! तन है मेरा ! "
ना तन तेरा
ना तन मेरा
माँ—बाप के कटपीस है हम
बच्चा है कटपीस हमारा

कटपीस से है सेज हमारी
कटपीस से है मेज हमारी
कटपीस का है कफन हमारा
कटपीस में है दफन हमारा
कटपीससे ना नफरत करना
पुरे थान पर कभी ना मरना
चिल्ला चिल्ला कर वह बोला
भेद सभी सृष्टि का खोला
" जोडी कही पर कही अकेला
दुनिया है " कटपीस " का मेला
कटपीस ले लो
कटपीस ले लो
कटपीस ले लो !

१९६५

## जात

जात जात होती
जात येत होती
जात जाताना
जातीला भेटली
जवळ खेटली
तशीच रेटली
सचिवालयापर्यंत
मदिरालयापर्यंत
शिवालयापर्यंत !
जात बोलू लागली
जात डोलू लागली
जात हालू लागली
वर्तमानपत्रांतून
परिषदांमधून
सभांमधून
जात जातीला चिकटली
दुसऱ्या जातीला खटकली
तिसऱ्या जातीने हटकली

विधर्मी
निधर्मी
परधर्मी होऊन
जात जाणार नाय
जात दुधावरची साय
जात जाईल कशी ?
जात गुळावरची माशी
जात पाहता लोचनी
सुख झाले ग साजनी
तो हा ' छत्रपती ' बरवा
तो हा ' पेशवा ' बरवा
बहुत सुकृत (?) ही जोडी
जात जातीला आवडी ।

२७ मार्च १९८३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक २५४६ २५११८
१८।११।८६
शाखा (स्थळ प्रत)

## भविष्यकाळ (?)

चातुर्वर्ण्याचं विष
आमच्या मेंदूत कालविलं गेलं
अन् या विषारी धुंदीत
मूठभर मोगलांच्या
मूठभर इंग्रजांच्या
टांकसाळीत तयार झालेल्या
नाण्यांचं लक्ष्मीपूजन
निर्लज्जपणे आम्ही केलं.
जातिभेदाच्या खडकावर
सर्वधर्मसमभावाचं
वृक्षारोपण झालं
फळाची अपेक्षा करीत असताना
त्या खडकानंच धर्मांतर केलं.
उद्याच्या अंधाराला
सांगेल भविष्यकाळ
भारतातही कधीकधी
उगवत होती सकाळ !

१६ जानेवारी १९८३

REFBK-0025148
REFBK-0025148